**दावेक—याचा साक्षीदार क्र. ०१ शपथेवर कथन करतो:**

**उलट तपासणी**
( गैरअर्जदार क्र. १ व ३ साठी सहा. सरकारी वकील श्री. के. डी. कोळपे )

०८. हे म्हणणे खरे नाही की, भुसंपादन होण्यापूर्वी सबंधीत कार्यालयाच्या अधिकारी आणि कर्मचा—यांनी संपादित करावयाच्या जमिनीमध्ये येवून स्थळ पाहणी आणि मोजणी आमच्या समक्ष केली होती. हे म्हणणे खरे आहे की, तलाठी यांच्यामार्फत आम्हाला नोटीस मिळाल्या होत्या. आम्ही भुसंपादन अधिकारी यांच्याकडे कागदोपत्री पुरावा सादर केला होता. काय केला होता, त्याबाबत आता मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, संपादन अधिकारी यांनी आम्हाला पुरावा सादर करण्याची संधी देवूनही आम्ही त्यावेळी तो सादर केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, संपादन अधिकारी यांनी आमच्या संपादित करावयाच्या जमिनीचा पुरेसा मोबदला बाजार भावाप्रमाणे दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, आमची शेतजमीन हालक्या प्रतीची कोरडवाहु शेतजमीन होती.

०९. आमच्या गावची लोकसंख्या सुमारे दोन हजार आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गावाला प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद केल्यानुसारच्या कोणत्याही सुविधा नाहीत. माझयाकडे साखर कारखान्याला उस घातल्याबाबत आणि बागायती पिके बाजारात विकल्या बाबत च्या पावत्या आहेत आणि त्या मी दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिज्ञापत्रामध्ये खोटे नमूद केलेले आहे की, आमच्या संपादित

केलेल्या शेतजमिनीची प्रती एकर बाजार किंमत रुपये दोन लाख होती.

१०. आमच्या शेतजमिनीच्या ७/१२ उता—यामध्ये पौळचा उल्लेख होता; परंतु झाडांचा उल्लेख नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दगडी पौळीचे दगड हे आम्ही ईतरत्र वापरलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगतो आहे की, आमच्या शेतीमध्ये सांगतो आहे तशी झाडे होती. आम्ही झाडांबाबत कोणी पाहणी करुन मुल्यांकन अहवाल दिला, हे सांगु शकत नाही. सिव्हील इंजिनिअर यांच्याकडून दगडी पौळची पाहणी करुन मुल्यांकन करण्याबाबत शासनाला माहिती दिली नव्हती. सदर मुल्यांकनाच्या वेळी शासनाच्या प्रतिनिधींना बोलावले होते का, याबाबत आता मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो आहे तसे कोणतेही मुल्यांकन सिव्हिल इंजिनिअर यांनी केलेले नाही.

११. मी खरेदीखतातील शेतजमीन संपादित शेतजमिनीच्या जवळ असल्याची दर्शविणारा गाव नकाशा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, संपादित शेतजमीन ही खरेदीखतातील शेतजमिनीपासून सुमाारे तीन किमी पेक्षा जास्त अंतरावर होती. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखतातील शेतजमीन ही संपादित शेतजमीनीपेक्षा उच्च प्रतीची होती. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले खरेदीखत हे विना मोबदला आणि अधिकच्या किंमतीने

केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शासनाकडून अधिकचा मावेजा मिळविण्यासाठी खोटा संदर्भ अर्ज केलेला आहे, त्यासबंधाने खोटे सर तपासणीचे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे आणि त्याचे खोटे समर्थन करीत आहे.

**फेर तपासणी** — निरंक.

दिनांक: ०६.०३.२०२६  श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरित/—

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.